महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

क्र. पी.आर-३/जीवन संजीवनी / No 23113 दिनांक : 21 JUL 2010

**वाणिज्य परिपत्रक क्र. ११९.**

**विषय :- ग्रामीण नळपाणी पुरवठा योजनांच्या थकित वीज देयकांच्या अदायगीसाठी "जीवन संजीवनी" ची अंमलबजावणी करण्याबाबत.**

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-११०९/प्र.क्र.०२०/पापू-०७ दि. १५ जून २००९.
२) वाणिज्य परिपत्रक क्र. ९६ दि. २०.०७.२००९.
३) शासन निर्णय क्र. ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१८५/पापू-०७ दि. २३ मार्च २०१०.
४) वाणिज्य परिपत्रक क्र. ११५ दि. १८.०५.२०१०.

राज्यातील ग्रामीण भागातील प्रादेशिक व स्वतंत्र नळपाणी पुरवठा योजनांच्या थकीत वीज देयके असणा-या ग्राहक संस्थांना त्यांच्या थकबाकीमध्ये सवलत देण्याची जीवन संजीवनी योजना संदर्भातील शासन निर्णय क्र. १ अन्वये लागु करण्यात आलेली होती. सदर योजनेच्या अटी व शर्ती वाणिज्य परिपत्रक क्र. ९६ दि. २०.०७.२००९ अन्वये अंमलबजावणीकरीता सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात आल्या होत्या. सदर योजनेची मुदत ३१.१०.२००९ पर्यत होती. सदर योजनेला मिळालेला चांगला प्रतिसाद तसेच विहित कालावधीत ज्या ग्राहक संस्थांना या योजनेमध्ये सहभागी होता आले नाही, अशा ग्राहकांना या योजनेमध्ये सहभागी होता यावे याकरीता शासनाने संदर्भ क्र. ३ च्या निर्णयानुसार सदर योजनेस ३१.१०.२०१० पर्यंत मुदत वाढ दिलेली आहे. सदर बाब सर्व क्षेत्रिय कार्यालयांना वाणिज्य परिपत्रक क्र. ११५ दि. १८.०५.२०१० अन्वये कळविण्यात आलेली आहे.

शासन निर्णयाप्रमाणे मुदत वाढ देताना जीवन सजीवनी योजनेचे स्वरुप, अटी वा शर्ती यामध्ये कुठलाही बदल करण्यात आलेला नाही. तरीसुध्दा क्षेत्रिय कार्यालयाना योजना अंमलात आणण्याकरीता कुठल्याही प्रकारच्या येणा-या अडचणी विचारात घेता सदर योजनेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे पुन्हा उद्धृत करण्यात येत आहे.

१) राज्यातील ग्रामीण भागातील प्रादेशिक व स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजनांच्या थकीत वीज देयके असणा-या ग्राहक संस्थांना (ग्रामपंचायत / जिल्हा परिषद / महाराष्ट्र जीवन प्राधिकरण) जीवन संजीवनी योजनेत सहभागी होता येईल.
२) या योजनेचा कालावधी ऑक्टोबर २०११ रोजी संपूष्टात येईल.
३) या योजनेकरिता सप्टेंबर २००९ च्या देयकात समाविष्ट थकबाकी गृहीत धरण्यात येईल.
४) ग्राहक संस्थांनी केलेल्या विनंती अर्जानुसार महावितरण कंपनीने दिलेल्या मागणी पत्राप्रमाणे थकबाकीच्या मुळ रकमेच्या ५० टक्के रक्कमेचा ३१ ऑक्टोबर २०१० पर्यंत भरणा केल्यास संबंधित ग्राहक संस्था या योजनेत सहभागी झाल्याचे मानण्यात येईल.

५) उर्वरित थकीत ५० टक्के रक्कमेचा भरणा येणा-या पुढील विद्युत देयकांसोबत ६ समान हप्त्यात १ वर्षात करावा.

६) या योजनेत सहभागी होणा-या ग्राहक संस्थांना या योजनेच्या कालावधीतील पुढील सर्व चालू वीज देयकाचा भरणा वेळेवर करणे बंधनकारक राहील.

७) ज्या ग्राहक संस्था सुरुवातीला मुळ रकमेच्या ५० टक्के रक्कमेचा भरणा केल्यानंतर उर्वरित मुळ रक्कमेचे हप्ते व चालू वीज देयकांचा भरणा विहित कालावधीत न केल्यास अशा ग्राहकसंस्था या योजनेच्या सवलतींचा लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत.

८) वरीलप्रमाणे मुळ थकबाकीच्या ५० टक्के एकरकमी रक्कम व उर्वरित ५० टक्के रक्कमेचे हप्ते व चालू देयके विहित कालावधीत भरणा न केल्यास माफ केलेली व्याजाची व विलंब आकाराची रक्कम व संपूर्ण थकबाकी सप्टेंबर २००९ च्या स्थितीतील पुर्व पदावर येईल.

९) या योजनेत सहभागी होणा-या ग्राहक संस्थांनी सहभागी होत असल्याचा आशयाचा ठराव करुन महावितरण कंपनीच्या क्षेत्रिय कार्यालयाकडे योजनेत सहभागी होत असल्याचा प्रस्ताव विहित नमुन्यात सादर करावा.

१०)ज्या ग्राहक संस्था ३१ ऑक्टोबर २०१० पर्यंत ठराव करुन ५० टक्के रक्कमेचा भरणा महावितरण कंपनीकडे करतील त्याच या सवलतीचा लाभ मिळण्यास पात्र राहतील. तसेच या सहभागी ग्राहक संस्थांना पुढील सर्व चालू वीज देयके व ६ हप्त्यांचा भरणा योजनेच्या कालावधीत वेळेवर करणे बंधनकारक राहील.

११) ज्या संस्था या योजनेमध्ये पूर्वी सहभागी झाल्या होत्या परंतु काही कारणास्तव त्यांनी नियोजित हप्ते अथवा चालू देयकांचा भरणा विहित कालावधीत केलेला नसेल व त्यांना या नविन योजनेमध्ये सहभागी होण्याची इच्छा असेल अशा सर्व संस्थांनासुध्दा या नविन योजनेत सहभागी होता येईल मात्र यासाठी खालीलप्रमाणे पूर्तता होणे बंधनकारक आहे. (चालू विज देयकांसाठी व्याज व विलंब आकार लागू राहील)

अ) अशा संस्थांनी थकीत राहिलेल्या हप्त्यांची रक्कम व त्यासोबत चालू विज देयकांचा भरणा ३१ ऑक्टोबर २०११ पर्यंत करणे आवश्यक आहे.

१२) ज्या संस्थानी या नवीन योजनेमध्ये सहभाग घेतलेला आहे परंतु पुढील चालू विज देयकांचा व हप्त्यांचा भरणा करण्यास असमर्थ ठरल्यास अशा ग्राहक संस्थानी दि. ३१.१०.२०११ पर्यंतची सर्व चालु वीज देयकांचा व्याज व विलंब आकार सहीत व उर्वरित हप्त्यांचा भरणा केल्यास अशा संस्थांना सुध्दा या योजनेचा लाभ मिळेल.

जीवन संजीवनी योजनेत सहभागी होत असल्याबाबत ग्रामपंचायतीने करावयाचा ठरावाचा नमुना (परिशिष्ट-अ), हमीपत्र (परिशिष्ट-ब), ग्रामपंचायतीने महावितरण कंपनीकडे करावयाचा अर्जाचा नमुना (परिशिष्ट-क) आणि जीवन संजीवनी योजनेमध्ये सहभागी झाल्यानंतर महावितरण कंपनीने ग्रामपंचायतीस कळविण्याचे प्रपत्र (परिशिष्ट-ड) वाणिज्य परिपत्रक क्र. ९६ सोबत निर्गमित करण्यात आलेले आहे.

119 (2/2)

तरी सर्व क्षेत्रिय अधिका-यांना सुचित करण्यात येते की, शासनाने सदर योजनेत दिलेल्या मुदत वाढीबाबत स्थानिक पातळीवर व्यापक प्रसिध्दी देऊन सदर योजनेची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

तसेच योजनेच्या अंमलबजावणी बाबतचा विभागनिहाय पाक्षिक अहवाल संबंधित परिमंडळाचे मुख्य अभियंता यानी या मुख्य कार्यालयात मुख्य अभियंता (वाणिज्य) यांच्याकडे दर महीन्याच्या १ तारखेस व १५ तारखेस पाठवावा.

**संचालक (संचालन)**

**प्रत रवाना : प्रेषण यादीप्रमाणे.**

D:\आर बी बी\PWW Sanjivani\Jivan Sanjivani Yojna Paripatrak.doc